# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 31/10/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

## अवैध्य मोहाफुल रसायण साठयावर

## —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कारवाई :—

दिनांक ३१/१०/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पो.स्टे देवलापार हद्दीतील चोरबाहुली शिवारात तलावाच्या काठावर अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना मुखबीर कडुन मिळालेल्या माहिती वरून चोरबाहुली शिवार येथे मोहाफुल गावठी भट्‌टीवर रेड केली असता फरार **आरोपी नामे—** अर्जुन यशवंत कोकोडे वय ३६ रा चोरबाहुली ता. रामटेक जि. नागपूर या नावाचा इसम दगड विटाच्या चुलीवर अवैधरीत्या मोहाफुल गावठी दारूची भट्‌टी तयार करून दारू गाळत असल्याबाबत गोपनिय बातमी मिळाल्यावरून स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण येथील स्टाफने नमुद घटनास्थळी अवैध मोहाफुल दारू भट्टीवर छापा मारून त्याचे ताब्यातुन १) १६०० लीटर मोहाफुल सडवा रसायन एकूण किंमती ३२,०००/— रू २) १५० लिटर मोहाफुल दारू किंमती ७५००/— रु ३) मोहाफुल दारू गाळण्याचे इतर साहित्य व ३२ प्लॅस्टिक ड्रम किंमती ३१४००/—रू. असा एकूण ७०,९००/— रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी विरूध्द पोलीस ठाणे देवलापार येथे अप. क्र. ४६५/२०२३ कलम ६५ (बी) (सी) (ई) (फ) म.दा.का. कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त मुद्देमाल व कागदपत्रे पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे देवलापार यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से), अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार पोलीस हवालदार शंकर मडावी, रोशन काळे, नितेश पिपरोदे, प्रमोद भोयर, उमेश फुलबेल यांचे पथकाने केली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर